# अमृता युनिव्हर्सिटीला मिळाला बहुमान

● मुंबई । प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्रांनी अमृता विद्यापीठाला भारतातलं पहिलंवहिलं लिंगसमानता आणि महिला सबलीकरणाचं अधिकृत अध्यासन प्रदान केले आहे. युनेस्को अध्यासन प्रदान करण्याचा सोहळा पॅरिसमध्ये ८००० उपस्थितांसमोर पार पडला. अमृता विद्यापीठाच्या कुलपती श्री माता अमृतानंदमयी देवी (अम्मा) यांच्या एका अध्यात्मिक कार्यक्रमामध्ये हा सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या पाहुण्यांमध्ये भारताच्या युनेस्को राजदूत आणि कायमस्वरूपी सदस्य रूचिरा कम्बोज, युनेस्कोच्या उच्चशिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. पीटर वेल्स यांचा समावेश होता. अमृता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. व्यंकट रंगन यांनी स्वाक्षरी केलेला करार विद्यापीठातर्फे डॉ. वेल्स यांच्याकडे सुपूर्द केला.

युनेस्कोच्या उच्चशिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. पीटर वेल्स म्हणाले, 'जगात विकास, लवचिकपणा आणि शांतता नांदायची असेल तर मुलींच्या शिक्षणाशिवाय दुसरा तरणोपाय नाही. या कामामध्ये अमृतासारख्या विद्यापीठांनी मार्गदर्शक आणि योजनात्मक भूमिका बजावली आहे. संशोधन आणि कृती यांच्या संगमावर युनेस्को अध्यासन कार्यरत असेल. कौशल्यापासून आरोग्य आणि वातावरणबदलापर्यंत आणि मोबाइल टेक्नोलॉजी ॲप्लिकेशन अशा महत्त्वपूर्ण विभागांसाठी टूलकिट्स विकसित करणं आणि कमकुवतपणा नेमकेपणाने हेरणे अशी महत्त्वाकांक्षा हे अध्यासन बाळगून आहे. अमृता विद्यापीठ आणि युनेस्को या दोन्ही संस्था मानवतावादी दृष्टिकोन बाळगतात. या साहचर्यामुळे मानवी हक्क, शांतता आणि प्रगतीसारख्या महत्त्वपूर्ण आघाड्यांवर सुयश मिळेल अशी खात्री वाटते.'

अमृता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. व्यंकट रंगन म्हणाले, 'लिंगसमानता आणि महिला सबलीकरणासाठी स्वतंत्र अध्यासन स्थापन करण्याची भारतातली ही पहिलीच घटना आहे. अत्यंत प्रगत राष्ट्रांमध्येही अशा प्रकारचे अत्यंत मोजके उपक्रम आहेत. येत्या चार वर्षांमध्ये, आम्ही भारतातल्या महिला आणि मुलींमधले कच्चे दुवे हेरून त्यावर सर्वोत्तम तोडगे काढण्याचा प्रयत्न करू. हे काम अतिप्रचंड असून त्याला तितकाच प्रचंड वाव आहे. या उपक्रमाचा प्रमुख रोख हा कमकुवतपणा हेरण्याकडे असेल, जो सुरक्षा, शिक्षण आणि कौशल्यविकास, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण, वातावरणबदल, आपत्ती जोखीम आणि आरोग्य आणि स्वच्छता याचा परिणाम असेल.'